## राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

## सेतू अभ्यास - उत्तर चाचणी

### विषय : मराठी

इयत्ता : चौथी एकूण गुण : १५

विद्यार्थ्याचे नाव : ---------------------------------------------------------------------

शाळेचे नाव: ------------------------------------------------------------------------

प्र. १ पुढील संवाद वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिही. गुण- ३

समीरा रडत रडत महेशला म्हणाली, "आजारी होते म्हणून मी आज घरचा अभ्यास केला नाही, पण आता बाईंचा ओरडा खावा लागणार!". महेश म्हणाला," शाळेत गेल्यावर बाईंना खरं कारण सांगितलं, तर बाई नाही ओरडणार तुला."..... तेवढ्यात रिक्षावाले काका ओरडले, "उतरा मुलांनो!"

अ. समीरा आणि महेश कुठे निघाले होते?

---------------------------------------------------------------

आ. समीरा का रडत होती?

--------------------------------------------------------------------------------

इ. वरील संवाद कुठे घडला असेल ते लिहा.

--------------------------------------------------------------------------------

प्र.२ जोड्या जुळव. गुण- १

अ. किल्ल्यांचा ------------ रास

आ. धान्याची ------------- जुडगा

झुबका

प्र.३ योग्य विरामचिन्ह वापरून वाक्य पुन्हा लिही. गुण- २

तू पुस्तके वह्या गणवेश आणि दप्तर आणले का

-----------------------------------------

प्र.४ दिलेल्या वाक्यातील अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून तयार होणारे योग्य वाक्य पुन्हा लिहा. गुण-१

आम्ही जंगलात दोन <u>मोर</u> फिरताना पाहिले.

-----------------------------------------

प्र.५ खालील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग कर. गुण- २

१. पश्चात्ताप होणे -

२. मन खट्टू होणे -

प्र.६ खालील वाक्यात कंसातील क्रियापदाचे योग्य रूप लिही. गुण- २

१. माझा दादा दोन दिवसांपूर्वी गावाहून ------------- (येणे)

२. मी रोज नियमितपणे अभ्यास -------------------------- (करणे)

प्र.७ खालील वाक्यातील 'नामे' ओळखून त्यांचे वर्गीकरण कर. गुण- १

मोर हा सुंदर पक्षी आहे.

सामान्य नाम--------------------- , विशेष नाम -------------------

प्र.८ कोरोनाच्या महामारीनंतर तुम्ही पहिल्या दिवशी शाळेत आल्यावर तुम्हाला कसे वाटले ? ते पाच वाक्यात लिही. गुण- ३